**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती  विशेष सभा क्रमांक :- १२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२६/११/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड" प्रकरण २ नियम ३(क) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **विशेष सभा क्र.१२ गुरूवार दि.२९/११/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये — अहमदनगर महानगरपालिका.

**गुरूवार  दिनांक- २९/११/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ६२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नियुक्ती करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत- विषय क्रमांक-  ६२ च्या  प्रस्तावाच्या  झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक-१२**

विषय क्रमांक- ६२ गुरूवार दि.२९/११/२०१२

ठराव क्रमांक- ६२ गुरूवार दि.२९/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नियुक्ती करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका जकात विभाग जा.क्र. २८७ दि.२२/११/२०१२ विषय- सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता पारगमन शुल्क संकलन करीता अभिकर्ता नेमणुकी बाबत.

सविनय सादर,

विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता पारगमन शुल्क संकलन करीता अभिकर्ता नेमणूक बाबत प्रसिध्दीस दिलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार २२/११/२०११ रोजी सकाळी ११.०० वा. मा.उपायुक्त यांचे दालनात प्रशासकीय निविदा छाननी समिती समक्ष पारगमन शुल्क चे ठेक्याकरीता प्राप्त निविदा उघडल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ नं. | निविदा धारकाचे नांव | निविदा फॉर्म फी | लिफाफा क्र.१ बयाणा रक्कम | लिफाफा क्र.२ तांत्रिक | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | डी.डी. क्र./ दिनांक | डी.डी. क्र./ दिनांक | १ वर्षाचा जकात व टोल वसुलीचा अनुभव | ३ वर्षाचे लेखा विवरणपत्र | पॅन कार्ड झेरॉक्स |
| १ | मे. मॅक्स लिंक | ४६८९ दि.१६/११/२०१२ | १३९१७० दि.२१/११/२०१२ | आहे | आहे | आहे |
| २ | मे. हिमाणी सिक्यरीटीज & अलायन्स | २०९४ दि.१०/११/२०१२ | ५२६८७४ व ५२६८७५ दि.२०/११/२०१२ | आहे | आहे | आहे |
| ३ | मे. कोणार्क इनफ्रास्ट्रक्चर लि. | ५७३९४८ दि.१२/११/२०१२ | १७६८६ दि.१९/११/२०१२ | आहे | आहे | आहे |

वरील प्रमाणे प्राप्त निविदाधारकांचे लिफाफा क्रमांक १ उघडण्यात आले असता त्यामध्ये प्राप्त वरील तीन ही निविदा धारक हे निविदा प्रक्रियेमध्ये पात्र असल्याबाबत छाननी समितीने खात्री केली.

निविदा धारकांची पात्रतेबाबत ची खात्री झाल्यानंतर दुपारी २.०० वा. सदर निविदा धारकांचे व्यापारी लिफाफा क्रमांक- २ उघडण्यात आले असुन सदर लिफाफ्यामध्ये खालील प्रमाणे देकार रक्कमा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | लिफाफा क्र.३ व्यापारी लिफाफा देकार रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. मॅक्स लिंक | रू.२१ कोटी ६ लाख | |
| २ | मे. हिमाणी सिक्यरीटीज & अलायन्स | रू. २१ कोटी | |
| ३ | मे. कोणार्क इनफ्रास्ट्रक्चर लि. | रू.२० कोटी १६ लाख | |

वरील प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमान देकार रक्कम रू.१९,९७,६७,३७४/- यापेक्षा मे. मॅक्स लिंक, पुणे यांची रक्कम रू.२१ कोटी ६ लाख कोटी इतक्या देकार रक्कमेची निविदा ही सर्वात जास्त देकार रक्कमेची प्राप्त झालेली आहे.

तरी वरील प्रमाणे सन २०१२-२०१३ करीता पारगमन शुल्क वसुलीस्तव निविदा प्रक्रियेमध्ये मे. मॅक्स लिंक, पुणे यांची निविदा मंजुर करून त्यांची अभिकर्ता नेमणूक करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची २ प्रकरण ८ मधील कलम ३५ नुसार मा.स्थायी समितीचे पुढे निर्णयास्तव सादर करण्यास पुढील योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- मनपा हद्दीत पारगमन शुल्क वसुली करिता अभिकर्ता नियुक्ती करणे कामी आलेल्या निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- सदर प्रकरणी मा.स्थायी समितीची सभा तात्काळ घेणेबाबत प्रशासनाने पत्र दिले आहे. मागिल वेळी स्थायी समिती अस्तित्वात असतांना अशी तात्काळ सभा घेणे बाबत कार्यवाही का केली नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ. / मा.सौ. खरमाळे सं.र. :- मागे मा.स्थायी समितीचे आठ सदस्यावर स्थायी समिती सभा घेणेत येत होत्या.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- मा.सभापती निवृत्त झाले होते. आता ३० तारखेस सध्याचे पारगमन शुल्क वसुली कामी नियुक्त केलेल्या संस्थेचा मुदत संपत असल्याने तात्काळ सभा घेणे बाबत पत्र दिले आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- मा. महापौरांना सभा घेणेचे अधिकार आहेत.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- शिक्षक मतदार संघाचा आचारसंहिता होती.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मनपाची आचारसंहिता असतांना सभा घेतली होता.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- तेव्हा सभापतीनां सभेस उपस्थित नसतांना उपस्थित सदस्यांमधून सभापतीची निवड करून स्थायी समिती सभा घेतली होती.

मा.सौ. कराळे आ. शि. :- वर्तमान पत्रामध्ये स्थायी समितीवर आरोप ठेवले जातात जबाबदारी प्रशासन का घेत नाही.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- आम्ही कुठलेही पत्रक प्रसिध्दी दिलेले नाही आम्हाला काहीही म्हणण्याचा अधिकार नाही.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- स्थायी समिती अस्तित्वात येउन आता चार महिने झाले आहेत तरी हा निविदा रकमेबाबत विषय का आला नाही.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- महासभेने पारगमन शुल्क देकार रक्कम निश्चित केलेनंतर निविदा मागविल्या होत्या त्यास प्रतिसाद मिळाला नसल्याने देकार रकमेबाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे पुढे सादर केली तेव्हा मा.स्थायी समिती सभेने देकार रक्कम निश्चित केली. त्यानुसार निविदा दर मागविले आहेत आलेले निविदा दर मंजूरीसाठी प्रस्ताव मा.सभे पुढे सादर केला आहे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविला.

मा.सभापती साहेब :- ही नविन निविदा आहे का फेरनिविदा आहे.

जकात अधिक्षक श्री. साबळे अे.डी. :- देकार रक्कम निश्चित केले नंतर ही निविदा मागविली आहे.

मा.सभापती साहेब :- पेपरला फेर निविदा म्हणून उल्लेख केला आहे. असे का म्हणण्यात आले आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- नव्याने निविदा प्रक्रिया राबवितांना एक महिन्याची मुदत देणे आवश्यक असतांना १५ दिवसाची मुदत का देण्यांत आली.

मा.सभापती साहेब :- शासन जी.आर. नुसार एक महिन्याची मुदत हवी होती. शासन निर्णयाचे उल्लंघन करून पंधरा दिवसाचे मुदतीची निविदा का ? काढली.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- नविन निविदा मागवितांना पहिल्या निविदेची मुदत किती असते.

जकात अधिक्षक श्री. साबळे अे.डी. :- तीस दिवसांची मुदत असते.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- देकार रक्कम निश्चित केलेनंतर पहिलीच निविदा असल्याने एक महिन्याची मुदतीची निविदा मागविणे आवश्यक असता पंधरा दिवसाची काढली त्यास फेर निविदा म्हटले आहे.

जकात अधिक्षक श्री. साबळे अे.डी. :- देकार रक्कम निश्चित झालेनंतर ही फेर निविदा काढली.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- मा. महासभेने देकार रक्कम निश्चित केलेनंतर निविदा दर मागविले परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्याने पारगमन शुल्काची फेर गणना करून निविदा मागविली मा. महासभेचे ठरावानुसार ॲग्रीमेट कालावधी दि.३०/११/२०१२ पर्यत असल्याने मा.स्थायी समिती सभेने देकार रक्कम निश्चित केलेनंतर १५ दिवसाची मुदतीची ई- टेंडर निविदा प्रसिध्दी केलेली कार्यवाही पारदर्शक असून त्याबाबत कुणीही हरकत घेतली नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ. :-एकाने हरकत घेतली नियम डावलून कार्यवाही का करता.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- मा.शासनाचे परिपत्रकानुसार कार्यवाही होणे आवश्यक असते. सदर प्रकरणी स्थायी समिती ऑब्जेक्शन घेउ शकते बरेचसे कागदपत्र सदर प्रकरणी दाखल नव्हते. ते अपलोड झाले नाही मा. महापौर यांनी प्रशासनास पत्र दिले होते ते पत्र या प्रकरणात नाही.

मा.सभापती साहेब :- ठेकेदाराच्या तक्रारी आहेत मा. महापौर यांनी पत्र दिले ते वाचून दाखवावे.

जकात अधिक्षक श्री. साबळे अे.डी. :- मा. महापौर यांनी दिलेले पत्र वाचून दाखवितो सभेत पत्र वाचण्यांत आले.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- आपण निश्चित केलेल्या देकार रक्कमे पेक्षा आलेले निविदा दर हे जास्तीचे असल्याने निविदा स्विकारणेस हरकत नाही.

मा.सौ. गंधे सु.मो. :- सदर प्रकरणी निविदा प्रक्रिया राबविताना योग्य काळजी घेत का नाही.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- आलेले निविदा धारकाचे कर वितरण पत्र बॅलन्स शीट, ऑडीट रिपोर्ट इत्यादी कागदपत्रे नाहीत काम केले ते जोडले आहे शासकीय वसुली सर्टिफिकेट पाहिजे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे आहे ते लोकल आहे त्याची कागद पत्रे पहाणे आवश्यक होते.

मा.श्री. गंधे सु.मो.:- छाननी समितीने योग्य काळजी न घेतल्याने पारदर्शकता नाही शंका निर्माण होते.

मा.उपायुक्त (सा) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- निविदा ओपन करतांना निविदा धारक स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी आलेनंतर त्याची कागदपत्रे वाचून दाखवितो या वेळी सर्व निविदा धारकांचे प्रतिनिधी हजर होते. त्याचे कागद पत्राबाबत प्रतिनिधींना तेव्हा सांगितले छाननीचे वेळी कागदपत्राची पुर्तता करतात मंजूरीने ते स्विकारून पुढील कार्यवाही केली सेकंडरी डॉक्युमेंट घेतले ते आपण ॲक्सेप्ट केले व्यापारी लिफाफा उघडयांना तीनही संस्थेचे प्रतिनिधी हजर होते. तेव्हा त्यांनी हरकत घेतली नाही. त्यांना ऑब्जेक्शनची संधी दिली.

मा.सभापती साहेब :- ऑडीट रिपोर्ट आवश्यक असता विवरण पत्र घेतले आहे हे बरोबर आहे का ?

मा.उपायुक्त (सा.) डॉ. श्री. डोईफोडे साहेब :- व्यापारी लिफाफा उघडले नंतर ते घेउ शकतो आलेली देकार रक्कम ही जास्तीची प्राप्त झालेली आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- त्यानी इन्कमटॅक्स कमी भरला आहे त्याचे ऑडीट रिपोर्ट वेगवेगळे आहत अनुभवाचे अटीची पुर्तताही पहावी.

मा.श्री. कोतकर सु.स. :- पारगमन शुल्क वसुली मनपा मार्फत करावी.

मा.उपायुक्त (सा.) डॉ. श्री. डोईफोडे साहेब :- मागचा ठेकेदार आहे त्याची मुदत दिनांक ३०/११/२०१२ ला संपते. आलेले निविदा दर जो पर्यत फायनल होत नाहीत. तो पर्यत मा. महासभेच्या ठरावानुसार मागच्या ठेकेदारास मुदत देता येईल.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- या प्रकरणाचा निर्णय होईपर्यत मागच्याच ठेकेदाराला मुदतवाढ द्यावी किंवा मनपा मार्फत पारगमन शुल्क वसुली करावा.

मा.सौ. गंधे सु.मो. :- सदर प्रकरणी निविदा प्रक्रियोची निविदा की फेर निविदा याबाबत तसेच त्यांच्या मुदती बाबत वकीलाचे मत घ्यावे.सध्याचे ठेकेदाराने नकार दिल्यास मनपाने पारगमन शुल्क वसुली करण्यात यावी.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- मा. शासनाचे परिपत्रकाचे उल्लंघन झाले आहे त्यानुसार राबविण्यांत आलेल्या निविदा प्रक्रियेच्या मुदती बाबत मुंबई उच्च न्यायालयाचे ,औरंगाबाद खंडपीठ येथील मनपाचे वकीलाचे मत घ्यावे. पारगमन वसुली सध्याचे ठेकेदाराने करावी.

मा.सभापती साहेब :- मा. शासनाच्या परिपत्रकाचे उल्लंघन झाले आहे. सदर प्रकरणी निविदा प्रक्रियोची निविदा की फेर निविदा व मुदतीबाबत मुंबई उच्च न्यायालयाचे ,औरंगाबाद खंडपीठ येथील मनपा विधी सल्लागारचे मत घेउन मा.सभेपुढे सादर करावे. तो पर्यत पुर्वीचेच ठेकेदारास मुदतवाढ देण्यांत यावी किंवा मनपा मार्फत पारगमन शुल्क वसुली करावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नियुक्ती करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्टावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

सदर प्रकरणी राबविण्यांत आलेल्या निविदा प्रक्रियेच्या मुदती बाबत मुंबई उच्च न्यायालयाचे ,औरंगाबाद खंडपीठ येथील मनपा विधी सल्लागार यांचा कायदेशीर अभिप्राय घेउन पारगमन शुल्क वसुली निविदा दर मंजूरी करिता प्रस्ताव सभे पुढे तात्काळ सादर करण्यात यावा. या निविदा प्रस्तावाचा निर्णय होईपोवतो सध्याचे कार्यरत अभिकर्ता संस्थेस मुदतवाढ देण्यात यावी याकामी संबंधीत संस्थेने नकार दिल्यास पारगमन शुल्क वसुली मनपा कर्मचा-या मार्फत करण्यांस संदर्भात निर्णय घेणेत यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका